# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) अंतर्गत तांत्रिक पदे कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधन तत्वावर भरणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) अंतर्गत कंत्राटी पध्दतीने मासिक एकत्रित मानधन तत्त्वावर खालील नमुद केलेले नागरी नियोजन तज्ञ म्हणुन ६ महिने कालावधीकरिता भरावयाचे असुन इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत. पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज, आधार कार्ड व शैक्षणिक अर्हतेविषयक कागदपत्रांच्या प्रती स्वसाक्षांकित करुनच फक्त नोंदणीकृत टपालानेच (रजिस्टर्ड एडी पोस्टाने) दि.२८/११/२०१९ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय नवीन प्रशासकिय इमारत, काप-आळी, जुनी एस.टी.स्टँड, भिवंडी, जि. ठाणे - पिन ४२१३०२ या पत्यावर पाठवावेत. मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच या कार्यालयात थेट अर्ज व ई-मेल द्वारे प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही / नाकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | मासिक भत्ता | शैक्षणिक अर्हता | आवश्यक अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १ | नागरी नियोजन तज्ञ | ०१ | ५०,०००/- | नियोजन विषयांतील पदव्युत्तर/पदवी | नगररचना विषयक कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव गृहनिर्माण विषयक पायाभुत प्रकल्पाचे कामाचा अनुभव आवश्यक. |

**सर्वसाधारण अटी व शर्ती**

१. गृहनिर्माण योजनेचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.
२. उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा अर्जावर स्पष्ट उल्लेख करावा.
३. अर्जासोबत सर्व प्रमाणपत्राच्या स्वसाक्षांकित सत्यप्रती जोडण्यात याव्यात. (जन्मतारीख, शिक्षण, अनुभव,आधार कार्ड तसेच अन्य शैक्षणिक प्रमाणपत्र इत्यादी). अपुर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.
४. अर्जामध्ये संपुर्ण नाव, पत्ता (पिन कोडसह), शैक्षणीक अर्हता, पुर्वानुभव नमुद करावा. तसेच पासपोर्ट आकाराचे अलिकडील काळाचे रंगीत छायाचित्र जोडावे.
५. नेमणुकीसंदर्भात निवड समितीने घेतलेले सर्व निर्णय अंतिम राहतील.
६. सदर नेमणूक संपुर्णपणे अस्थायी स्वरुपाची असून कोणत्याही उमेदवारास सदर जाहीर सुचनेच्या अनुषंगाने सेवेत कायम /नियमीत केले जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारास विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र करुन द्यावे लागेल.
७. नियुक्ती देणे / नाकारणे तसेच नमुद कालावधीचे आंत कोणत्याही क्षणी सेवेतुन कमी करणेबाबतचे अधिकार मा.आयुक्त यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.
८. आपली नेमणुक ठोक वेतनावर ६ महीन्याच्या कालावधीकरीता अस्थायी स्वरुपाची असेल.

**सही/-**
**उप-आयुक्त (मुख्यालय)**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.**

**मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने.**

Gen.Admin-2/D Drive/Genral Folder 2017/Ravi K 2017/Order & T ani File 2017/Page No- 550

Scanned with CamScanner